Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 473 – 478

DOI: 10.5281/zenodo.10135470

Original Research Article

# महात्मा गांधीजींची विश्वस्त संकल्पना

अलका पद्माकरराव चिकुर्डेकर

संशोधक विद्यार्थी, तत्वज्ञान विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: alkachikhurdekar@gimal.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

महात्मा गांधी हे नाव घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास अपूर्ण आहे 21 व्या शतकातही ज्यांच्या विचाराचा मानवी जीवनावर प्रभाव दिसून येतो सत्य अहिंसा व ब्रह्मचार्य या त्रयीवरच त्यांचे शिक्षण विषयक संकल्पना ईश्वर व मानवी जीवनासंबंधी तत्त्वज्ञान आधारित आहे महात्मा गांधी हे आदर्शवादी विचारवंत होते त्यांना राज्य विरहित वर्ग विरहित व संथाधीष्टीत समाज अपेक्षित होता अशा समाजाची निर्मिती करण्यासाठी साधन व साध्य व साधन सुचीतेची फारच गरज होती मुळात मनुष्य हा सत्सक विवेक बुद्धीने स्वतःच्या हिताचे निर्णय घेण्यास समर्थ असतो म्हणून हा व्यक्ती विकास व व्यक्ती स्वातंत्र्यासाठी आवश्यकता नाही पण अपरिग्रह ही संकल्पना सर्वच भारतीय दर्शनातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहे पक्षी प्राणी पक्षी ही आपल्याला जेवढी लागेल तेवढेच घेतो म्हणून मानवाने आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करून जे उरेल त्याचा उपयोग समाजाच्या विकासासाठी केला पाहिजे त्यातूनच महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना उदयास आली अनेक मान्यवर प्रतिष्ठित लोकांनी त्याला पाठिंबा दिलेला दिसून येतो त्याचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे आहे.

महात्मा गांधींचे विश्वस्त संकल्पना ही त्यांच्या आर्थिक विचाराचा एक महत्वपूर्ण घटक मानला जातो राजकारण धर्मकारण समाजकारण इत्यादी आधार मानवतावाद होय.

दक्षिण आफ्रिकेत निरनिराळ्या धर्माचे, वर्गाचे जातीचे हितसंबंध वेगवेगळया असले तरी ते परस्पर विरोधी नव्हते त्यामुळे त्यांची एकजूट गांधीजींच्या छत्राखाली झाली होती. भारतात मात्र भांडवलदार शेतकरी कारखानदार यांचे कलह वाढत जात होते या झगडामुळे गांधींनी आयुष्याच्या मार्गाने वरिष्ठ वर्गाचे हृदय परिवर्तन करून सोडवण्याचा प्रयत्न केला स्वतःच्या जमिनीवर रात्रंदिन खपून उत्पन्न करणारा शेतकरी त्यांना आदर्श समाज व्यवस्थेचा मूलभूत घटक वाटत होता. ती मताला विरोध करण्याचे कारण उत्पादन साधनाचे राष्ट्रीयकरण केल्यास त्यातून काही लोकांच्या हाती सत्ताही राजकीय किंवा आर्थिक दृष्ट्या सत्तेचे केंद्रीकरण होऊन व्यक्ती स्वातंत्र्याचा बळी जाण्याची भीती गांधींना वाटत होती.

श्रमजीवी वर्गाचे शोषण थांबविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय करणाला अंशक पर्याय म्हणून त्यांनी विश्वस्त वृत्ती trust ship कल्पना मांडली

**Trust ship विश्वस्त वृत्तीचा उदय**

विश्वस्त वृत्तीचा उदय पुरितीन धर्म मतांमध्ये आहे जगातील सर्वच वस्तूंवर ईश्वराची सत्ता आहे माणसाने फक्त उपजीविकेचे अधिकार प्राप्त केलेली आहेत व्यक्तीला जेव्हा एखाद्या व्यवसायात यश मिळते ते ईश्वर कृपेने प्राप्त होते त्याचा स्वतःसाठीच वापर करणे हे चुकीचे आहे संपत्तीचा पण हिशोब हा प्रत्येक व्यक्तीने अपरिग्रह वृत्तीने ईश्वर वाला समर्पण करणे म्हणजेच विश्वस्त वृत्ती होय.

यु रिटर्न धर्माचा भर हा निवृत्ती वर असून त्याचा अर्थ आर्थिक बचत होय.

गांधींनी परमेश्वराच्या जागी दरिद्र नारायणाची स्थापना करून श्रीमंतांनी आपली संपत्ती समाजाच्या मालकीची आहे असे समजावे आपण फक्त विश्वस्त आहोत असे समजून आपल्या किमान गरजा भागविण्यासाठी पैसे वाचवणे उरलेल्या पैशाचा विनियोग समाज कल्याणसाठी करावा अशी कल्पना गांधींनी मांडली.

बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी गांधींनी प्रथमतः आपल्या भाषणात विश्वस्त वृत्तीचा उल्लेख केला सत्येंद्र यांनी आपल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून जनतेच्या कल्याणासाठी वापर करावा असे सांगितले यामध्ये प्रामुख्याने मालक व मजूर याबाबत बोलताना अलाहाबाद येथील गिरणी कामगारांच्या संपाच्या प्रसंगी मालक व मजूर अखेर एकाच कुटुंबाचे दोन घटक आहेत कारखानदार हा पित्याच्या जागी समजून त्याच्याकडे सवलतीची मागणी करावी दोन्हीतील संप समोपचाराने सोडवावा.

**मतपरिवर्तन**

कोणतीही संपत्ती ही ईश्वराची आहे त्यामुळे कामगार भांडवलदार संघर्ष हा हिंसेने सोडविण्या हा मार्ग नसून एखादा कारखानदार श्रीमंत योग्य मार्गाने ऐकत नसेल तर सत्याग्रहाच्या मार्गाने त्याचे मतपरिवर्तन घडवून आणणे हे गरिबांचे नैतिक कर्तव्य होय. महात्मा गांधी यांनी खाजगी संपत्तीचा विचार नैतिक दृष्टिकोनातून केला कारण नैतिकतेच्या दृष्टीने जर भांडवलदाराने नैतिक दृष्टिकोनातून विश्वस्त वृत्तीचे आचरण नाकारले तर मजूर व कामगारांनी कोणतेही सहकार्य देऊ नये जर कोणी अनैतिक मार्गाचा अवलंब करीत असेल तर उपोषण हरताळ बहिष्कार इत्यादी मार्गाने त्याला योग्य मार्ग दाखवावा.

यासंबंधीची रूपरेषा आहे किशोरी लाल नरहरी पारीक व इतर सदस्यांच्या संयोगातून निर्माण झाली. महात्मा गांधींनी यात काही फेरबदल करून त्यात प्रामुख्याने सहा तत्त्वांचा समावेश केला.

१. तीही व्यक्ती अवाजवी संपत्ती बाळगणार नाही जर संपत्ती स्वतःजवळ ठेवत असेल तर ती समाजाची एक विश्वस्त म्हणून ठेवावी लागेल.

२. या संपत्तीची मालकी व उपयोग हा समाजासाठीच असेल.

३. जो कोणी विश्वस्त वृत्तीचा स्वीकार करेल तो त्याला वैयक्तिक सुखासाठी आपली संपत्ती खर्च करता येणार नाही.

४. कमीत कमी व जास्तीत जास्त संपत्ती संपत्ती किती असावे हे नेमाने स्पष्ट करावे.

५. गांधीवादी अर्थव्यवस्थेत केलेले उत्पादन हे सामाजिक दृष्टिकोनातून समाज हित डोळ्यासमोर ठेवून केले पाहिजे व्यक्तिगत हिताला कधीही प्राधान्य असणार नाही.

६. समाजात अशा प्रकारे परिवर्तन घडवून आणले पाहिजे ज्यामध्ये मागणी व पुरवठा यांचे योग्य संतुलन राखले जाईल.

७. विश्वस्त वृत्तीचे आधार - प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जे डी सेठी यांच्या मतानुसार या सिद्धांताचे तीन प्रमुख आधार आहेत. १) सत्य २) अहिंसा ३) स्वराज्य व समता हे सर्व एकमेकांवर अवलंबून आहेत.

सत्य व अहिंसा हे शारीरिक श्रम व अपरिग्रहावर अवलंबून आहेत.

**१. सत्य**

गांधी तत्त्वज्ञानात सत्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सत्याची निर्मितीसाठी अहिंसा हे फार मोठे शस्त्र त्यांना सापडले. सत्य हेच ईश्वर असे म्हणताना ते सर्वसमावेशक व सर्वमान्य असा सिद्धांत होय. सत्य हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय होय. त्यासाठी गांधीजी कोणतेही बलिदान, त्याग करण्यास तयार होते.

**२. अहिंसा**

अहिंसा मानव जातीसाठी असे शस्त्र आहे की ज्या पुढे कितीही पारावी राहिला झुकावेच लागेल. त्याद्वारेच व्यक्ती आपल्या ध्येयापर्यंत जाऊ शकतो. अहिंसा हेच साधन व साध्य.

**३. शारीरिक श्रम**

प्रत्येक व्यक्तीला आपल्या उदरनिर्वाहालाही श्रमच करावे लागते. ही कल्पना त्यांनी टॉय यांच्या विचाराने प्रभावित होऊन घेतली होती. कर्म ही पूजा याद्वारेच व्यक्ती ईश्वरापर्यंत पोहोचण्यास मदत होते.

जेव्हा प्रत्येक व्यक्ती आपल्या योग्यतेनुसार, गरजेनुसार कर्म करते, श्रम करते त्यावेळीच तो आपल्या कष्टाचा ट्रस्टी बनतो.

**४. अपरिग्रह**

अपरिग्रह याचा अर्थ दुसऱ्याच्या नियंत्रण व व मग ते कोणाचेही असो म्हणजे भौतिक वस्तूसाठी दुसऱ्यांवर विसंबून नसणे तर तर चोरी म्हणजे ज्या वस्तूंची आपल्याला गरज (आता)नसते ती घेणे होय. म्हणून अपरिग्रहाची संकल्पना ही व्यक्तीला प्रत्येक गोष्टीतून लालसा कमी करण्याची शिकवण देते.

**भारतीय दृष्टिकोनातून विश्वस्त वृत्ती**

विश्वस्त वृत्ती ही गांधीजींची स्वतःची कल्पना नव्हे तर हिशोबनिषदातील आहे. ही मंदिरासंबंधी वापरली जाते ज्यात मंदिराची संपूर्ण संपत्तीची व्यवस्था ही कोणत्याही प्रशासनिक आधाराशिवाय, वैयक्तिक स्वार्थाशिवाय ती व्यक्ती करते.

भांडवलदार / जमीनदार यांचे हृदय परिवर्तनासाठी काही उपाय पुढील प्रमाणे सांगितले-

१. श्रीमंताच्या मनामधील पवित्र भावना (दान, परोपकार, सेवावृत्ती इत्यादी) जागृत करणे.
२. त्यासाठी त्यांची मनापासून तयारी करणे.
३. कोणतीही परिवर्तन केवळ हिंसेद्वारेच होऊ शकते त्या मताचे खडक करून हृदय परिवर्तनाला महत्त्व देणे.
४. पिढी त्यांनी जर असहकार सत्याग्रह यासारख्या मार्गाचा अवलंब केला तर जुलमी शोषण करण्याच्या कार्यावर परिणाम घडतो.
५. त्यातून कायदेशीर सनदशीर परंतु शिस्त पूर्ण व्यवस्थेची निश्चितच निर्मिती होईल असा गांधीजींचा विश्वास होता.

**विश्वस्तांचे गुण**

१. तो स्वयंशासित / स्वयंशिस्तीचा असला पाहिजे.
२. नैतिक संवेदनशील असला पाहिजे.
३. दुसऱ्यांच्या भावनेची कर्तव्य प्रतिपालन करणारा.
४. उदार वृत्ती व दुसऱ्यांचे सुख कशात आहे ते पाहणारा.
५. तो नेहमी वित्तातून व कर्तव्यातून समाज संपत्ती प्रत जबाबदार असतो.
६. तो नेहमीच अपरिग्रहवादी असून स्वतःसाठी आवश्यकतेपेक्षा जास्त संपत्तीचा संग्रह करीत नाही.
७. तू नेहमीच समाजाच्या हितकारक व उपयोगी अशा नवनव्या योजना कशा प्रकारे अमलात आणता येतील हे पाहतो.

**सारांश**

1942 साली म. स्थानबद्ध असताना आपल्या सहकार्यासोबत एक मसुदा तयार केला. त्यात नंतर सुधारणा केल्यावर खालील मुद्द्यांच्या आधारे त्यांनी विश्वस्त संकल्पना स्पष्ट केली.

१. आधुनिक भांडवलदारी समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणून समतावादी तत्त्वावर पूर्ण घटना करण्याचे साधन ज्यामुळे मानवी स्वभावात स्वार्थांबरोबर परोपकारी भावना निर्माण होण्यात मदत होईल.
२. समाज ज्या वेळेत गरज असेल तेव्हा खाजगी मालकीला परवानगी देईल परंतु विश्वस्त वृत्तीत हा मालकी हक्क मान्य नाही.

३. संपत्तीची मालकी व वापर यावर कायदेशीर बंधने घालणे आम्ही वर्ज्य मानत नाही.

४. शासन नियंत्रित विश्वस्त वृत्तीमध्ये कोणाही व्यक्तीला समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून वैयक्तिक सुखासाठी संपत्ती साठविता येणार नाही.

५. समाजात काम करणाऱ्या प्रत्येकाचे कमाल व किमान वेतन ठरविण्यात यावे.

६. गांधी प्रणित अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे स्वरूप वैयक्तिक प्रेरणा किंवा लोभ याने न ठरता सामाजिक गरजा नुसार ठरविले जाईल.

**टीका**

म. गांधींचे विचार हे वर्तमान समाज व्यवस्थेला पटण्यासारखे नव्हते. कारण आर्थिक संकल्पना ही जनता भिमुख असली तरी काळानुसार व शास्त्रशुद्ध विश्लेषणाच्या अभावाने समाजातील वास्तव परिस्थितीचे त्यांना आकलन झाले नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात चरखा खादी ही देशभक्तांचा गणवेश म्हणून पाहिला जाई. परंतु स्वातंत्र्यानंतर धनिकांचा त्याकडे पाहण्याचा महत्व / दृष्टिकोन हा बदलला. परिणामी शासकीय अनुदानावर अवलंबून राहण्याची पाळी त्यांच्यावर आली.

स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात देश मत औद्योगीकरणाला चालना मिळाली. परिणामी त्यातून गरजा अमर्यादितपणे वाढल्या व ज्या गोष्टीसाठी गोष्टीसाठी तत्त्वांसाठी गांधींनी विचार मांडले त्याकडे दुर्लक्ष झाले.

नियोजनाच्या काळात आर्थिक सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण होत गेले आणि देशाच्या बेकारीत वाढ झाली. पण भांडवलशाही व्यवस्थेचे स्वरूप, दिशा, समाजकारण, राजकारण, साहित्य, वृत्तपत्रे यावर होणाऱ्या परिणामांची गांधींचे चिंतन कमी पडले. सामान्यतः हा सिद्धांत वाटतो तेवढा नैतिक व सामाजिक दृष्टिकोनात अंगीकारणे सोपा नाही म्हणून ज्या अराज्यवादी समाजाची निर्मिती गांधीजींना अभिप्रेत होती त्यात काही मर्यादा होत्या कारण असंघटित व विस्कळीत अशी जनता कोणत्याही अर्थव्यवस्थेला पायबंध नियंत्रित करू शकत नाही.

**सारांश**

भारतीय इतिहासाच्या पानात गांधीयुग हे सुवर्णमय आहे. कोणतीही दळणवळण साधने प्रमाणात नसतात दरिद्री अज्ञान बेकारी प्रचंड असताना सर्व देशातील जनतेला एकटा खाली आणण्याचे काम हे काही सोपे नव्हते.

यामुळेच समाजात स्वयंशिस्त, नैतिकता, परोपकार वृत्ती इत्यादीमुळे समाजात एक वेगळीच शिस्त गांधींनी निर्माण केली. परंतु काँग्रेसच्या कोणत्याही कार्यक्रम पत्रिकेवर जनतेच्या दारिद्र्य व बेकारीला प्रथम स्थान देण्याचे काम आजही दिसते हेच गांधींचे प्रमुख यश होय.

दुर्बल दारिद्र्यातील जनतेबद्दल गांधींना वाटणारी सहानुभूती न्यायासाठी केलेले प्रयत्न यामुळे राष्ट्रीय सभेच्या चळवळीबद्दल सर्व सामान्य लोकांना आपुलकी वाटू लागली. स्वतःच्या राजकीय आर्थिक हक्कांची जाणीव त्यांना होऊ लागली. त्यामुळे सुसंस्कृत स्वार्थाच्या प्रेरणेतून का होईना पण लोकशाही राज्यपद्धती व कल्याणकारी शासन या तत्त्वांना भांडवलदार वर्गाला मान्यता द्यावी लागली हेच गांधी युगाचे महत्त्व होय.